# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १०९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०२/२०१८

१) संगनमत करुन तरुणीला शिवीगाळ करुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनाक २६/०२/२०१८ चे ०८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही किराणा सामान घेवुन घरी जात असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन, पाठलाग करुन रस्त्यात अडवुन आरोपी क्र. १ ने तु आपल्या मामाच्या मुलासोबत लग्न का करते, असे बोलुन फिर्यादीचा हात पकडुन लज्जा उत्पन्न होईल असे ओढंतान करुन शिवीगाळ करुन मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४(ड),३४१,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फटींग पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

२) शासकीय कामात अडथळा निर्माण करुन मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनाक २६/०२/२०१८ चे १०.१५ ते १०.४० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ग्रा. पं. चा चपराशी असुन हा ग्रा. पं. चे घर टॅक्स वसुली करीता फिर्यादी याचे घरी गेला असता यातील आरोपी हा तेथे जावुन फिर्यादीला घर टॅक्स पेक्षा जास्त पैसे घेतेस, असे म्हणुन भांडण करुन फिर्यादीचे हातातील रजीस्टर फाडले व सरकारी कामात अडथळा केला व फिर्यादीचे कॉल्लर पकडुन खाली पाडुन मारपीट, शिवीगाळ करुन मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३५३,३३२,१८६,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

३) संगनमत करुन सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनाक ११/०२/२०१८ चे २६/०२/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे म.रा.वि.वि कं. गोबरवाही येथे सहा. अभियंता पदावर कार्यरत असुन दिनांक ११/०२/२०१८ ला नाकाडोंगरी कृषी फिटरची उच्च दाबाची वाहीनीचे वायर तुटुन पडलेले वायर जोडणे कामी ते व त्याचे स्टॉपसह वेळोवेळी गेले असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिटरचे वायर जोडु न देता त्यांनी सरकारी कामात अडथळा आणल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३५३,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

४) सोन्या,चांदीचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी . :–

दिनाक २१/०२/२०१८ चे १३.३० ते २६/०२/२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे कुटुंबासह घराला ताला लावुन नातेवाईकाचे घरी घराचे वास्तुपुजनाला बाहेर गावी गेले असता यातील अज्ञात आरोपीने कोणीही नसल्याची संधी साधुन घराचे बाथरुम जवळील दाराची कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करुन घरातील बेडरुम व देवघरातील आलमारीत ठेवलेले सोन्याचा मंगळसुत्र गहुमनी वाला वजन १ तोळा, ४ नग चांदीच्या पैरपटया वजन ६० ग्रॅम, २ जोड चांदीचे छल्ले वजन २० ग्रॅम, १ जोड चांदीचा कमरपट्टा वजन ३ तोळे व नगदी २५,०००/–रु. असा एकुण ४५,७००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी मुलचंद बाबुलाल जयस्वाल वय ६५ वर्ष रा. लाखांदुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

५) अज्ञात ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे दोन जखमी . :–

दिनाक २६/०२/२०१८ चे ००.३० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी मृनमय भोजराम तागडे वय १८ वर्ष, रा. उसरीपार हे सिडी डॉन डिलक्स मोटार सायकल क्र. एमएच ३६ एस ३००९ ने राजन बोरकर सह डब्बल सिट बसुन पब्लीक स्कुल सिलीब्रेशन हॉल मधुन भंडारा येथे जाण्याकरीता एनएच–६ रोडने येत असता विरुध्द दिशने नागपुर कडे जाणा–या यातील अज्ञात आरोपी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन समोरुन कट मारुन मोटार सायकल वरील दोन्ही ईसमांना जखमी करण्यास कारणीभुत होवुन पळुन गेल्याने जखमी फिर्यादीचे बयाण, एमएलसी रिपोर्ट व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भडारा हे करीत आहेत. .

६) मोटार सायकलची चोरी . :—

दिनांक २५/०२/२०१८ चे ०८.०० वाजता ते २६/०२/२०१८ चे ०८.०० दरम्यान यातील फिर्यादी सामान्य रुग्नालय भंडारा येथे आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ एस १२१६ किंमती ३०,०००/—रु. ची हिरो आय स्मार्ट पोपटी रंगाची ठेवुन नातलग पेंशटला भेटण्यास गेले त्या दरम्यान ठेवलेल्या ठिकाणी परत आल्यानंतर मोटार सायकल ही दिसुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी ज्ञानराज मानिकराव पुडके वय ३८ वर्ष, रा. मुरमाडी सावरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. फटींग पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

७) संगनमत करुन महिलेस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन राफ्टरने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २६/०२/२०१८ चे २०.०० दरम्यान यातील फिर्यादी मुलाने आरोपीचे कोंबडयाला पवनी येथे विकले व फिर्यादी यानी तोच कोंबडा आरोपींना घरी परत नेवुन दिला तरी त्याच कारणा वरुन यातील आरोपी क्र. १ ने वाईट शिवीगाळ करुन आरोपी क्र. २ ने फिर्यादीचे अंगणात जावुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन घरचा दरवाजा तोडुन घरात प्रवेश करुन फिर्यादीचे डावे डोळयाचे खाली राफ्टरने मारुन जखमी केल्याने फिर्यादींचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५२,३२४,५०९,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. .

६) अवैध दारु /जुगार अड्डयांवर धाडी . :—

दिनांक २६/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, जवाहरनगर, मोहाडी, कारधा, करडी, आंधळगाव, गोबरवाही, साकोली, पवनी व लाखांदुर येथे अवैध दारु/ जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण १२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ११३ लिटर हातभट्टी दारू+ २०० किलो सडवा+ साहित्य किंमती २२,७२५/—रु. तसेच ८६ लिटर ४०० मिली लिटर देशी दारु किंमती २४,९६०/—रु. तसेच जुगारातुन किंमती १५५/—रु. असा एकुण किंमती ४७,८४०/—रु. माल जप्त करण्यात आला.

27.2

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.

# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ११०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०२/२०१८

**१) भांडण व शिवीगाळ करुन विष प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०२/२०१८ चे २२.०० ते २४.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले आईचे घरी झोपली असता आरोपी हा तेथे जावुन माझ्या मुली माझ्या घरी पाठव, म्हणुन भाऊ संजय ढोरे व मामा सुरेश कुत्तरमारे यांचेसह भांडण करुन शिवीगाळ केली व गावातील चौकात विष प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याने त्यास औषधोपचारा करीता ग्रा. रु. लाखांदुर येथे भरती केले असे फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ४४८,५०४,५०६,३०९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोहवा. मांढरे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २६/०२/२०१८ चे १७.०० ते १८.०० वाजता. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीचे महीन्द्रा रुलर हाऊसिंग फायनन्स कंपनीचे १०,०००/–रु. रक्कमेचा अपहार केला त्यास कंपनीने नौकरी वरुन काढण्याचा निर्णय घेतला असता आरोपीने लोखंडी रॉड घेवुन कंपनीच्या हाऊसिंग मध्ये प्रवेश करुन फिर्यादी कर्मचा–यास अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने तसेच लोखंडी रॉडने कार्यालयातील काच फोडुन नुकसान केल्याने फिर्यादी आशिष ईकबाल शेख वय ३० वर्ष, रा. प्लॉट नं. १०७ लेआऊट पोलीस लाईन टाकळी नागपुर यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४०६,४४८,२९४,४२७,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाळे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २६/०२/२०१८ चे १८.३० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन ही दारु पिवुन दारूचे नशेत पोस्ट ऑफीस चौक भंडारा येथे चालवितांनी मिळुन आल्याने, श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने व सोबत वाहन चालविण्याचा परवाना न बाळगल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बडवाईक वा.नि.शा. भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोहवा. गजभिये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) गळफास लावुन इसम मिळुन आल्याने मर्ग नोंद . :–**

दिनांक २५/२/२०१८ चे २२.०० ते २४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सोमाजी दाजीबा तेलमासरे वय ५८ वर्ष, रा. भेंडाळा याने पत्नीला त्याचा मृतक मुलगा हेमंत सोमाजी तेलमासरे वय ३७ वर्ष, रा. भेंडाळा हा घरी स्लॅपचे हुकाला नॉयलॉन दोरीच्या सहायाने गळफास घेवुन आत्महत्या करुन मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत.

५) सर्पद्वंश केल्याने उपचारा इसमाचा मृत्यु :—

दिनाक २५/२/२०१८ चे २१.३० ते २४.०० वाजता दरम्यान यातील मृतक कवळु राघोजी तुमसरे वय ४५ वर्ष, रा. गोंडसावरी ला साप चावल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्या रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. देवकते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पोलीस स्टेशन लाखनी करीत आहेत. .

६) विहीरीचे पाण्यात तरुण मृत अवस्थेत मिळुन आला. :—

दिनाक २५/२/२०१८ चे १७.३० ते २५/२/२०१८ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील मृतक हेमराज रामदास बोन्द्रे वय २८ वर्ष, रा. हनुमान वार्ड वरठी याला त्याचे वडीलांनी नवीन कपडे घालुन नुस्ता फिरतो घरचे काम करीत नाही असे बोलले असता या कारणा वरुन मृतकने रागाचे भरात घराचे बाहेर निघुन गेला रात्री उशीरा पर्यत घरी परत आला नाही म्हणुन मृतकचा शोध आजु बाजुला व नातेवाईकात शोध घेतला असता मिळुन आला नाही दिनांक २६/०२/२०१८ ला मृतकचे कपडे नहराचे पुलीयावर दिसुन आल्याने शेत शिवारातील बालपांडे यांचे विहीरीत गळ टाकुन पाहीले असता गळा सोबत मृतकाचे प्रेत पाण्याचे वर आल्याने फिर्यादी रामदास चिंधुजी बोन्द्रे वय ५९ वर्ष, रा. हनुमान वार्ड वरठी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. श्रीरामे पोलीस स्टेशन वरठी करीत आहेत. .

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक २६/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ४७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी किंमती ०३, तीन सिटर वाहनाकरीता ०४ ईतर वाहनांवरती — ४० केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.